दि हिंदुस्थान
को-ऑपरेटिव्ह
बँक लि. मुंबई

HINDUSTHAN BANK
दि हिंदुस्थान को.ऑ.बँक लि. मुंबई

# The Hindusthan Co-Op. Bank Ltd., Mumbai

HEAD OFFICE : HORIZON TOWER, 1ST & 2ND FLOOR, JAI SHASHANK CO-OP. HSG. SOCIETY LTD.,
OPP. ATI, V.N. PURAV MARG, CHUNABHATTI, MUMBAI - 400 022. • Tel. No.: 022-24052121 / 2424 / 2525
Email : support@hindusthanbank.com • Website : www.hindusthanbank.com

## ४९ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

### (फक्त सभासदांसाठी)

बँकेच्या सर्व सभासदांना कळविण्यांत येत आहे की, बँकेची ४९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा **शनिवार दिनांक २१ सप्टेंबर, २०१९ रोजी दुपारी ३.३० वाजता कै. स्मिता सामंत सभागृह, शांताराम कृष्णाजी पंत वालावलकर माध्यमिक विद्यालय, डेअरी रोड, नेहरु नगर, कुर्ला (पू), मुंबई ४०० ०२४** येथे खाली दिलेल्या विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यात आली आहे. तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे, ही विनंती.

### - सभेपुढील विषय -

१. दिनांक २२ सप्टेंबर २०१८ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून ते कायम करणे.
२. संचालक मंडळाने सादर केलेल्या दिनांक ३१ मार्च, २०१९ अखेरच्या आर्थिक वर्षाच्या अहवालास तसेच वैधानिक लेखापरिक्षकांनी प्रमाणित केलेल्या ताळेबंद व नफातोटा पत्रकास मंजुरी देणे.
३. सन २०१८-२०१९ या सहकारी वर्षाच्या वैधानिक लेखापरिक्षकांच्या लेखापरिक्षण अहवालाची नोंद घेणे.
४. सन २०१७-२०१८ च्या वैधानिक लेखापरीक्षण अहवालाच्या दोषदुरुस्ती अहवालाची नोंद घेणे.
५. संचालक मंडळाने शिफारस केलेल्या नफ्याच्या विभागणीस मान्यता देणे.
६. सन २०१९-२०२० या सहकारी वर्षाकरिता बँकेच्या संचालक मंडळाने अंतर्गत तसेच कंकरंट लेखापरिक्षकांची नेमणूक केली आहे, त्यास अंतिम मान्यता देणे.
७. सन २०१९-२०२० या सहकारी वर्षाकरिता वैधानिक लेखापरिक्षकांची नेमणूक करणे.
८. सन २०१८-२०१९ या सहकारी वर्षाच्या मंजूर अंदाजपत्रकापेक्षा कमी-जास्त झालेल्या उत्पन्न व खर्चास तसेच संचालक मंडळाने सुचविलेल्या सन २०१९-२०२० च्या अंदाजपत्रकास मंजुरी देणे.
९. उपविधी दुरुस्तीस मंजुरी देणे.
१०. बँकेच्या नवीन मुख्य कार्यालयामधील इंटेरिअर/फर्निचर कामांच्या बिलास अंतिम मंजुरी देणे.
११. दि.३१.०३.२०१९ अखेर "बुडित खाती" म्हणून वर्गवारी असणारी उत्पन्न क्षमता नसणाऱ्या थकित कर्ज खातेदारांची मुद्दल रक्कम व व्याज रक्कम, वसुलीचे हक्क अबाधित ठेऊन बुडित व संशयित कर्ज निधीतून व येणे व्याज निधीतून निर्लेखित करण्याबाबत विचार विनिमय करणे.
१२. महाराष्ट्र शासनाच्या "एक रकमी परतफेड योजने" अंतर्गत सवलत दिलेल्या थकित कर्ज खात्यांची माहिती घेणे व संचालक मंडळाच्या निर्णयाची नोंद घेणे.
१३. सन २०१९-२०२० मधील सभासद प्रशिक्षण कार्यक्रमास मंजुरी देणे व गतवर्षीचा आढावा घेणे.
१४. वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असलेल्या सभासदांची रजा मंजूर करणे.
१५. मा. अध्यक्षांच्या अनुमतीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

संचालक मंडळाच्या आदेशावरुन
सही/-
**सुनिल सदाशिव पटवर्धन**
सरव्यवस्थापक

दिनांक : ७.०९.२०१९
मुंबई

### - विशेष सुचना -

१. गणसंख्येअभावी सदर सभा तहकूब झाल्यास ती सभा त्याचठिकाणी ठरलेल्या वेळेनंतर अर्ध्या तासाने घेण्यात येईल व त्या सभेस गणसंख्येचे बंधन राहणार नाही.
२. कोणत्याही सभासदास अहवालासंदर्भात काही माहिती हवी असल्यास अशा सभासदांनी दिनांक १५.०९.२०१९ पर्यंत बँकेच्या मुख्य कार्यालयाकडे कार्यालयीन वेळेत लेखी कळविणे आवश्यक आहे. जेणेकरुन माहिती पुरविणे सुलभ होईल. आयत्यावेळी विचारलेले प्रश्न स्वीकारणे बंधनकारक राहणार नाही.
३. सभेस येताना सभासदांनी नोटीस प्रत सोबत आणणे अत्यावश्यक आहे.
४. ज्या सभासदांनी रु.१,०००/- पेक्षा कमी रकमेचे भाग भांडवल घेतले आहे, त्यांनी आवश्यक त्या रकमेचा भरणा करुन किमान ४० शेअर्सची (एकूण रु.१,०००/- पर्यंत) रक्कम लवकरात लवकर पूर्ण करावी.
५. सभासदांनी आपला बदललेला पत्ता त्वरीत कळवावा.
६. सभासदांनी आपल्या वारसाची नोंद केलेली नसल्यास ती करुन घ्यावी.
७. ज्या सभासदांनी आपल्या भागावरील मागील तीन वर्षाचा लाभांश घेतला नसेल त्यांनी तो घेऊन जावा, अन्यथा नियमानुसार सदर रक्कम राखीव निधीत वर्ग करण्यात येईल.
८. ज्या सभासदांनी अद्यापपर्यंत आपले भाग दाखले घेतले नसतील, त्यांनी ते बँकेच्या मुख्य कार्यालय / शाखा कार्यालयातून घेऊन जावेत.
९. सभासदांनी आपली वार्षिक अहवालाची प्रत जवळची शाखा किंवा मुख्य कार्यालय येथून घेऊन जावी.
१०. शैक्षणिक गुणवत्तेनुसार पात्र ठरलेल्या भागधारकांच्या पाल्यांचा सत्कार दरवर्षी वार्षिक सर्वसाधारण सभेत करण्यात येतो. खालीलप्रमाणे गुण मिळवून उत्तीर्ण झालेल्या आपल्या पाल्यांची नावे त्यांच्या गुणपत्रिकेच्या साक्षांकित प्रतीसह दिनांक १५.०९.२०१९ पर्यंत जवळच्या शाखेत अथवा मुख्य कार्यालयात कळवावी, त्यानंतर येणाऱ्या नावांचा विचार केला जाणार नाही.

| | | |
|---|---|---|
| १) | एस्. एस्. सी. (१० वी) | ७५% व त्यापेक्षा जास्त |
| २) | एच. एस्. सी. (१२ वी) | ७०% व त्यापेक्षा जास्त |
| ३) | पदवीधर तसेच पदव्युत्तर व तत्सम परिक्षा | ६५% व त्यापेक्षा जास्त |